जिल्हा परिषद, गोंदिया

**सामान्य प्रशासन विभाग**

वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) मार्यादीत स्पर्धा परिक्षा § २०२३

परिक्षेचा दिनांक १४ जुलै २०२४

**सामाजीक आरक्षणानुसार परिक्षेसाठी रिक्त घोषीत केलेल्या पदांचा तपशीत**

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज.ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | आदुघ | खुला | एकुण | दिव्यांग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | ० | १ | ० | १ | १ | ० | १ | ० | ० | ४ | ० |

- मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या कडुन प्राप्त गुणांकन यादी / निकालानुसार समाजीक व समांतर आरक्षणाप्रमाणे वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) पदावर निवड झालेल्या उमेदवारांची यादी.

| गुणवत्तेनुसार क्रमांक | उमेदवाराचे नाव | आसन क्रमांक | मिळालेले गुण | उमेदवाराचा प्रवर्ग | उमेदवाराचा निवड झालेला प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | तोंडे स्नेहल वासुदेव | NAG - २७० | १२५ | भ.ज.ड. | भ.ज.ड. |

**( गोविंद खामकर )**
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य),
जिल्हा परिषद, गोंदिया

**(मुरूगानंथम एम. ,भाप्रसे)**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, गोंदिया

# जिल्हा परिषद, गोंदिया

सामान्य प्रशासन विभाग ,

जि.प.प्रशासकिय इमारत, जिल्हा गोंदिया

ceozp.gondia@maharashtra.gov.in
zpceo_gondia@rediffmail.com

Phone No :- 07182 236425
07182-233595


क्रमांक/जिपगो/साप्रवि/वस/कार्या-४/ 1683 /२०२४ दिनांक :- 11 सप्टेंबर २०२४

वाचा :- १. महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७

२. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक परिक्षा १०८९/सीआर २६४/८९/१३ दिनांक १८ डिसें. १९८९

३. ग्रामविकास विभाग,शासन परिपत्रक क्रमांक परिक्षा १०९०/७६१८/प्र.क्र.३/०९ दिनांक १७ मे १९९०

४. ग्रामविकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्रमांक परिक्षा १०८९/सीआर२६४/८९/१३ दिनांक २७ मार्च १९९१

५. मा.विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्र./विशा/आस्था/कार्या१०(३)/कावि/१५४२/ २०२४ दिनांक २१.०८.२०२४

## आदेश :-

ज्याअर्थी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील विहीत केलेल्या तरतुदीच्या अधिन राहुन कनिष्ठ सहाय्यक (लिपीक), संगणक व भांडारपाल या संवर्गातुन विभागीय मर्यादीत स्पर्धा परीक्षेव्दारे वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) संवर्गातील २५ % पदे भरण्याची तरतुद आहे. त्यानुसार मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या मार्फत कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) संवर्गातील कर्मचारी यांची विभागीय मार्यादीत स्पर्धा परिक्षा २०२३ दिनांक १४.०७.२०२४ रोजी घेण्यात येवुन सदर परिक्षेचा निकाल वरील वाचा क्रमांक ०५ मध्ये दर्शविलेल्या पत्रान्वये प्राप्त झालेला आहे.

त्याअर्थी निम्नलिखित विभागीय मार्यादीत स्पर्धा परिक्षा २०२३ मधील उत्तीर्ण व गुणवत्ताधारक कनिष्ठ सहायक (लिपीक) यांची **तात्पुरती नेमणूक** जिल्हा सेवा (वर्ग-३) (लिपीक वर्गीय ) (तृतीय श्रेणी) मधील **वरिष्ठ सहायक ( लिपीक)** या पदावर **एस - ८ (रु. २५५०० - ८११००) या** वेतनस्तरावर (नियमाप्रमाणे मिळणाऱ्या इतर भत्यासह) आदेशात नमुद केलेल्या अटी व शर्तीवर करण्यात येत असून त्यांची पदस्थापना त्यांचे नावासमोर रकाना क्र. ०६ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी पुढील आदेशापर्यंत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | कार्यरत कार्यालय | कर्मचारी जात प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५ | ६. |
| **१.** | **कु. स्नेहल वासुदेव तोंडे** | **पंचायत समिती, तिरोडा** | **भ.ज. ड** | **भ.ज. ड** | P.S. Gondia |

वरील उमेदवाराचे सेवापुस्तकात प्रथम नोंद घेतांना आदेशाबरोबर नेमणुकीच्या प्रवर्गाची सुध्दा नोंद करण्यात यावी.

### नियुक्तीच्या अटी व शर्ती

१) उमेदवारास हे आदेश मिळताच ३० दिवसाचे आत कामावर रुजू व्हावे लागेल. अन्यथा त्यांची नेमणुक रदद करण्यात येईल. तसेच विहीत मुदतीत उमेदवार रुजु न झाल्यास नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या पुर्व परवानगी शिवाय रुजु करुन घेऊ नये.

२) उमेदवारास जेथे रुजु व्हावयाचे आहे, तेथील अधिका-यांसमोर मुळ शैक्षणिक प्रमाणपत्रे व जात वैधता प्रमाणपत्र इत्यादी दस्तऐवजांच्य छायांकीत प्रती सादर करावे लागेल.

३) संबंधीत कर्मचारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणात बदल किंवा अंशत: बदल करण्याबाबत राजकीय अथवा अन्य कोणत्याही मार्गाने दबाव आणल्यास संबंधिताविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( वर्तणूक) नियम १९६७ व महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक १२.१२.२०२१ मधील तरतुदीनुसार सहा महिन्याचे आत सक्षम प्राधिकाऱ्याकडुन जात वैधता प्रमाणपत्र (मागास प्रवार्गातुन नियुक्ती झाली असल्यास) सादर करणे बंधनकारक राहील.

५) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई कडील अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०००/ प्र.क्र.(१७/२००)/१२, दिनांक २८ मार्च, २००५ चे नियम ३ मधील तरदतूदीनुसार सदर नियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून पुढे अपत्यांची (मुले/मुली) संख्या-२ पेक्षा अधिक झाल्यास सदर कर्मचारी सेवामुक्त करण्यास पात्र राहील. याबाबत त्यांना **नमुना-अ** मध्ये प्रतिज्ञापत्र रुजु होतांनी कार्यालय प्रमुखास लिहून द्यावे लागेल.

६) वित्त विभाग , शासन निर्णय वेतन १११९/प्रक.क्र.३/२०१९/सेवा-३ दिनांक ०२ मार्च २०१९ नुसार वर्ग -३ व वर्ग -४ कर्मचा-यांना पदोन्नती संधी उपलब्ध नसल्यामुळे असलेली कुंठितता घालविण्यासाठी लागु करण्यात आलेल्या योजनेअंतर्गत यापूर्वी वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) पदाची वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. अशा कर्मचा-यांची सदर नेमणूकीमुळे नव्याने वेतननिश्चीती करता येणार नाही. वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) पदाची वेतनश्रेणी देण्यात आली नसल्यास संबधीत कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती बाबतचा विकल्प १ महिण्याचे आत दयावे लागेल अन्यथा त्यांचे या पदावरील वेतन निश्चिती मुदतीनंतर सरळ महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११ (१) (एक) खाली करण्यात येईल.

७) सेवेच्या कालावधीत नोकरीवर लागतांना सादर केलेले शैक्षणिक/व्यवसायीक पात्रतेचे, जातीचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र तसेच इतर दस्ताऐवज खोटे सादर केल्याची बाब निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता उमेदवाराला सेवेतुन कमी करण्यात येईल.

८) सदरची पदोन्नती ही शासनाकडुन निर्गमित होणाऱ्या सुधारीत आकृतीबंधाच्या अधिन राहुन देण्यात येत आहे.सुधारीत आकृतीबंधात पदे कमी झाल्यास त्यानुसार अतिरिक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांस त्यांचे मुळ पदावर पदावनत करण्यात येईल. या अटीवर नेमणूक देण्यात येत आहे.

९) सदर आदेशाने नियुक्ती दिल्यानंतर संबंधीताचे नियुक्तीबाबत कोणी आक्षेप घेतल्यास व प्राथमिक चौकशी अंती त्यात तथ्य आढळुन आल्यास अगर नियुक्तीचे वेळी / नियुक्तीसाठी सादर केलेली माहिती चुकीची आढळुन आल्यास दिलेली नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर व कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल.

१०) उमेदवारास नियुक्तीनंतर मुख्यालयी वास्तव करणे बंधनकारक राहील.

११) वेळावेळी निर्गमित होणारे सेवा शर्ती बाबतचे शासन निर्णय/ परिपत्रके उमेदवारास बंधनकारक राहतील.

१२) वरील प्रमाणे सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असुन मला मान्य असल्याबाबत उमेदवाराने बंदपत्र लिहुन कार्यालय प्रमुखांना सादर करावे लागेल. त्या शिवाय त्यांना रुजु करुन घेता येणार नाही.

10/09/24

(मुरुगानंथम एम., भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, गोंदिया

**प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर :-**

१) मा. अध्यक्ष / मा. उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, गोंदिया

**प्रतिलीपी माहिती व पुढील कार्यवाही करीता अग्रेषीत.**

१. मुख्य लेखा वित्त अधिकारी / उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), जि.प.गोंदिया

२. कार्यालय प्रमुख --------------------- यांना माहिती व पुढील कार्यवाही करीता अग्रेशीत. संबंधीत कर्मचारी यांना रुजु करुन घेतांना या आदेशतील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत प्रतिक्षापत्र सबंधीत कर्मचारी यांच्या कडुन लिहुन घेवुन नंतरच रुजु करुन घ्यावे.

३. **गटविकास अधिकारी, पंचायत समिती, तिरोडा** सदर आदेश प्राप्त होताच. नव्याने नियुक्ती देलेल्या कर्मचा-यांच्या कार्यभाराची स्थानीक व्यवस्था करुन नव्याने नियुक्ती दिलेले कर्मचारी यांना त्वरीत कार्यमुक्त करण्यात यावे.

४. **कु. स्नेहल वासुदेव तोंडे, कनिष्ठ सहाय्यक मार्फत गटविका अधिकारी, पंचायत समिती, तिरोडा** यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना. त्यांनी तीस दिवसांचे आत आवश्यक कागदपत्रासह नेमणुक दिलेल्या कार्यालयात हजर व्हावे अन्यथा आदेश रदद करण्यात येईल.

५. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन क्रमांक ०४, ८

10/09/24

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, गोंदिया